# प्रेसनोट

## पाटणसांवगी, तह. सावनेर जिल्हा नागपूर येथील मंडळ अधिकारी यांचे विरूध्द नागपूर लाचलचुपत प्रतिबंधक विभागाने केली यशस्वी सापळा कारवाई.

यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या शेतजमीनीचे फेरफार करणेकरीता महसुल विभाग मंडळ पाटणसांवगी, तह. सावनेर जिल्हा नागपूर येथे अर्ज सादर केला होता. आरोपी लोकसेवक श्री. प्रविण हरगोंविद मेश्राम, वय ४७ वर्षे, पद- मंडळ अधिकारी, मंडळ पाटणसांवगी, तह. सावनेर जिल्हा नागपूर यांनी शेतजमीनीचे फेरफार करणेकरीता ७५,०००/- रुपये लाचेची मागणी केली व दिनांक १२/०५/२०२६ रोजी ५०,०००/- रूपये तक्रारदार यांचेकडुन घेवुन शेतजमीनीचे फेरफार केले. परंतु आरोपी लोकसेवक श्री. प्रविण हरगोंविद मेश्राम, पद- मंडळ अधिकारी यांनी उर्वरीत २५,०००/- रुपये करीता तक्रारदार यांचेकडे तगादा लावल्याने तक्रारदार यांनी ACB कार्यालय नागपूर येथे तक्रार नोंदवली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. प्रविण हरगोंविद मेश्राम, वय ४७ वर्षे, पद- मंडळ अधिकारी, मंडळ पाटणसांवगी, तह. सावनेर जिल्हा नागपूर यांनी शेतजमीनीचे फेरफार केल्याचे कामाचे मोबदला म्हणुन उर्वरीत २५,०००/- रूपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करून करून स्विकारण्याची तयारी दर्शविली.

सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. प्रविण हरगोंविद मेश्राम, वय ४७ वर्षे, पद- मंडळ अधिकारी, मंडळ पाटणसांवगी, तह. सावनेर जिल्हा नागपूर यांनी तक्रारदार यांचेकडुन यांनी शेतजमीनीचे फेरफार केल्याचे कामाचे मोबदला म्हणुन उर्वरीत २५,०००/- रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. याबाबत पोलीस स्टेशन सावनेर, नागपूर ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिंगबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक व श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र सहारे, सापळा पथक श्रीमती वैशाली आठवले, पोलीस निरीक्षक, मपोहवा अस्मिता मल्लेलवार, सरीता राऊत, पोहवा अनिल बहिरे, पोअं. मिलींद मेश्राम, चालक मपोअं हर्षलता भरडकर सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.

नागपूर जिल्हयातील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आंत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**<u>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा</u>**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,

२. टोल फ्री क्रमांक : १०६४ / व्हॉटसॲप क्र. ९०६७६७१०६४

३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६

४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१

५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९

६. श्री. राजीव कर्मलवार, पोलीस निरीक्षक, वाचक लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०